पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १८१**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २२/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक **२२/०७/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते तसेच सदर सभेत काही सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहूल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. .मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.तुपे – प्र.अतिरिक्त आयुक्त (३) तथा सह शहर अभियंता (वि/यां), मा.सुभाष इंगळे – उप आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH हे सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.पवार – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – लेखा व वित्त अधिकारी, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.अलमलेकर, मा.दुरगुडे – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.चव्हाण, मा.खाबडे, मा.गलबले, मा.घोडे, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.देशमुख – कार्यकारी अभियंता, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले -**

विषय क्र.१३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, क क्षेत्रिय कार्यालयातील तातडीच्या कामांना वाढ/घट करणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.१४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये कोरोना (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे.

विषय क्र.१५) COVID-19 आपत्कालीन उपाययोजना COVID-19 Call Center व COVID-19 Data Entry कामकाजासाठी नागरी सुविधा केंद्रचलकांमार्फत Data Entry Operator यांची नियुक्ती करणेबाबत.

विषय क्र.१६) ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सांगवी उपविभागातील गॅस शव वाहिनी तीन वर्षाकरिता चालन, देखभाल दुरूस्ती करणे.

विषय क्र.१७) पिंपरा चिंचवड क्षेत्रातील साथरोग COVID-19 च्या परिस्थितीमध्ये काही आवश्यक कामकाजासाठी मानसेवि (Volunteer) साठी मानधन अदा करणेबाबत.

विषय क्र.१८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशामक विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर मानधनावर तात्पुरत्या नियुक्तीबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१९) सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

----------

अ) दिनांक ०१/०७/२०२० दु.२.३० वा, दि.०८/०७/२०२०(दु.२.१५वा.) व दि.१०/०७/२०२० दु.२.१५ वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७८) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०८/०७/२०२० (दु.२.३० वा.) व दि.१०/०७/२०२० (दु.२.३०) वा झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७९) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ई) दिनांक १५/०७/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१८०) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७२५२ विषय क्रमांक – १

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – वाहन दुरूस्ती कार्य.

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.काशा/३/कावि/१९१/२०२०, दि.२९/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने विषाणूचा प्रादुर्भाव कमी करणेकरीता वैद्यकीय अधिकारी यांच्या श्रेत्रीय कार्यालयनिहाय फिल्ड सर्व्हिलन्स् टिम तयार करण्यात करण्यात आलेल्या असून या टीमकरीता लागणारी आवश्यक सुमो तत्सम प्रकाराची वाहने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड त्यांचेकडील मंजूर दराप्रमाणे उपलब्ध करणेबाबत कळविणेत आले होते. मा.उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मे.श्री.शिवसमर्थ ट्रॅव्हल्स भोसरी यांच्याकडून आवश्यकतेप्रमाणे लागणारी वाहने फिल्ड सर्व्हिलन्स टिमकरीता दि.२०.०३.२०२० पासून २८ वाहने भाड्याने पुरविण्यात आलेली आहेत. सदरची बाब तातडीची असल्याने या कामाकरीता वाहने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांचे मार्फत नियुक्ती केलेल्या एजन्सिकडून थेट पद्धतीने भाडेतत्वावर घेऊन त्यास मा. स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेणेस दिनांक १९/०३/२०२० च्या प्रस्तावान्वये मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच यापुढे कोरोना विषाणू प्रादुर्भाव वाढत राहिलेस याबाबत आवश्यकते प्रमाणे आणखी वाहने भाडयाने घेणे आवश्यक आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना या संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मनपा दवाखान्या करिता फिल्ड सर्विलन्स टिम साठी आवश्यक असलेली २८ वाहने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मार्फत मे. शिव समर्थ ट्रॅव्हल्स भोसरी या एजन्सी कडून घेण्यात आलेली असून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील शासकीय मंजूर दराने (प्रतिदिनी तवेरा – र.रु.२२००/-, झायलो – र.रु.२६००/-, इर्टीगा – र.रु.२६००/-, इनोव्हा – र.रु.२६००/-) दि.२०.०३.२०२० पासून दि.३१.०५.२०२० पर्यंत निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनांचा खर्च ( दैनंदिन भाडे ) र.रु.४७,२८,९०८/- व यापुढे वैद्यकीय विभागास सदर कामासाठी पुढील तीन महिन्या करिता अंदाजे र.रु.७५ लाख असे एकूण र.रू.१,२२,२८,९०८/- (अक्षरी र.रु एक कोटी बावीस लाख अठ्ठावीस हजार नऊशे आठ फक्त) चे खर्चास सोबतचे प्रपत्र अ नुसार मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मगाणी असली तरी, प्रस्तुत कामासाठी र.रू.४७,२८,९०८/- (अक्षरी र.रू.सत्तेचाळीस लाख अठ्ठावीस हजार नऊशे आठ फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५३ विषय क्रमांक – २
दिनांक – २२/०७/२०२० विभाग – वाहन दुरूस्ती कार्य.
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.काशा/३/कावि/२१७/२०२०, दि.०८/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने विषाणूचा प्रादुर्भावकमी करणेकरीता मा.अति.आयुक्त (२) यांनी दि.०८/०५/२०२० रोजी प्रभाग स्तरावर कम्युनिटी किचन कामकाजाकरिता उप अभियंता यांना जीप/सुमो/तवेरा/इनोव्हा या प्रकारची वाहने महापालिकेच्या ३२ प्रभागाकरिता ३२ वाहने उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील मंजूर दराने उपलब्ध करून देणेबाबत समक्ष सूचना देलेल्या आहेत व त्यास मा.आयुक्त यांनी हि मंजुरी दिलेली आहे. मा.उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मे.श्री.शिवसमर्थ ट्रॅव्हल्स भोसरी यांच्याकडून ३२ वाहने उप अभियंता करिता दि.१२/०५/२०२० पासून भाड्याने पुरविण्यात आलेली आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना या संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कम्युनिटी किचन करिता महापालिकेच्या ३२ प्रभागाकरिता ३२ वाहने उप अभियंता यांना उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मार्फत मे.शिव समर्थ ट्रॅव्हल्स भोसरी या एजन्सी कडून घेण्यात आलेली असून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील शासकीय मंजूर दराने (प्रतिदिनी तवेरा – र.रु.२२००/-, झायलो – र.रु.२६००/-, इर्टीगा – र.रु.२६००/-, इनोव्हा – र.रु.२६००/-) दि.१२/०५/२०२० पासून दि.३१/०५/२०२० पर्यंत निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनांचा खर्च (दैनंदिन भाडे) र.रु.१४,१५,३८०/- (अक्षरी र.रु चौदा लाख पंधरा हजार तीनशे ऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५४ विषय क्रमांक – ३
दिनांक – २२/०७/२०२० विभाग – इ क्षेत्रिय.
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ –मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.ईक्षेका/नि-६/कावि/३९/२०२०, दि.१३/०७/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते २) नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असून मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५५ विषय क्रमांक – ४

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वैद्य/३/कावि/४३५/२०२०, दि.१४/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागांतर्गत ०८ रुग्णालये व २७ दवाखाने कार्यरत असून, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे बहुविध शाखांचे व ७५० बेडसचे अद्यावत रुग्णालय पदव्युत्तर संस्थेसह सुरु आहे. सद्यस्थतीत कोरोना या विषाणूच्या संसर्गामुळे फैलावणा-या कोवीड १९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावास आळा घालणेकरीता शासन मार्गदर्शक सुचनांनुसार Covid Care Centre (सीसीसी), Dedicated Covid Health Centre (डीसीएचसी), Dedicated Covid Hospital (डीसीएच) निश्चति करुन या ठिकाणी रुग्णांच्या उपचारांची सोय महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोवीड १९ आजाराने बाधीत रुग्णांकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याकरीता महापालिकेमार्फत कार्यक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी Covid Care Centre (सीसीसी), Dedicated Covid Health Centre (डीसीएचसी), Dedicated Covid Hospital (डीसीएच) सुरु करण्यात आलेले असून काही कोवीड केअर सेंटर प्रस्तावित आहेत. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे:

| अ.क्र. | नाव | प्रकार |
|---|---|---|
| रुग्णालये | | |
| १ | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय | DCH |
| २ | नवीन भोसरी रुग्णालय | DCHC |
| ३ | नवीन जिजामाता रुग्णालय | DCHC |
| कोवीड केअर सेंटर | | |
| १ | पिंपरी चिंचवड कॉलज ऑफ इंजिनिअरिंग हॉस्टेल, आकुर्डी | CCC |
| २ | रिजनल टेलिकॉम सेंटर, शाहूनगर | CCC |
| ३ | सिम्बॉयसिस कॉलेज हॉस्टेल, किवळे | CCC |
| ४ | डॉ.डी.वाय.पाटील मुलींचे हॉस्टेल, आकुर्डी | CCC |
| ५ | आदिवासी विभाग मुलांचे व मुलींचे हॉस्टेल, मोशी | CCC |
| ६ | डॉ.डी.वाय.पाटील आयुर्वेदिक कॉलेज हॉस्टेल, संत तुकाराम नगर | CCC |
| ७ | बालाजी युनिव्हर्सिटी लॉ कॉलेज, बीआरटीएस रोड | CCC |
| ८ | इंदिरा कॉलेज हॉस्टेल, युनिव्हर्सल कॅम्पस | CCC |
| ९ | बालेवाडी हॉस्टेल | CCC |
| १० | सामाजिक न्याय विभागाचे मुलांचे व मुलींचे वसतीगृह, मोशी | CCC |
| ११ | म्हाडा वसाहत, म्हाळुंगे, चाकण | CCC |

वरील, त्याचप्रमाणे कोवीड १९ चे अनुषंगाने कंटेन्मेंट झोन सर्व्हेक्षण, अहवाल इ. बाबतचे कामकाज केले जात आहे. प्रमाणे कोवीड केअर सेंटर व्यतिरिक्त महानगरपालिकेची खालील रुग्णालये देखील सुरु असून या ठिकाणी कोवीड १९ व्यतिरिक्त अन्य रुग्णांवरील उपचार केले जात असतात

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| १ | तालेरा रुग्णालय |
| २ | भोसरी रुग्णालय |
| ३ | आकुर्डी रुग्णालय |
| ४ | सांगवी रुग्णालय |
| ५ | यमुनानगर रुग्णालय |
| ६ | थेरगाव रुग्णालय |
| ७ | जिजामाता रुग्णालय |

सद्यस्थितीत उद्भवलेल्या कोविड १९ आजाराच्या संसर्गामुळे महापालिकेमार्फत करणेत येत असलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेली Covid Care Centre, Dedicated Covid Health Centre व Dedicated Covid Hospital तसेच याव्यतिरिक्त अन्य रुग्णालये चालविण्याकरीता महापालिकेस मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची (डॉक्टर्स, स्पेशलिस्ट, पॅरामेडिकल स्टाफ इ.) आवश्यकता भासत आहे. या ठिकाणी आवश्यक संख्येचे प्रमाणात अधिकारी/ कर्मचारी उपलब्ध नसल्याने व सद्यस्थितीत उद्भवलेल्या कोवीड१९ या संसर्गजन्य आजाराचे पार्श्वभूमीवर वैद्यकिय अधिकारी तसेच अन्य पॅरामेडिकल कर्मचारी यांच्या मानधन स्वरुपात रूग्णालयीन कामकाजाचे सोईचे दृष्टीने हंगामी स्वरूपात दरमहा एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी नेमणूका करण्यात आलेल्या असुन आवश्यकतेनुसार आणखी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेत येत आहे व तशी आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.मवैअ-२०२०/प्र.क्र.१५२/सेवा-३, दि.२९ मे २०२० रोजीचे शासन निर्णयानुसार शासनाच्या सेवेतील कंत्राटी तसेच बंधपत्रित वैद्यकिय अधिका-यांचे मानधनामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करणेत आलेली आहे:

| अ.क्र. | कंत्राटी व बंधपत्रित वैद्यकिय अधिकारी | सुधारीत मासिक मानधन |
|---|---|---|
| १ | आदिवासी व दुर्गम भागात काम करणारे एम.बी.बी.एस. अर्हताधारक | रु. ८०,०००/- |
| २ | आदिवासी व दुर्गम भागात काम करणारे विशेषज्ञ अर्हताधारक | रु. ९०,०००/- |
| ३ | इतर भागात काम करणारे एम.बी.बी.एस. अर्हताधारक | रु. ७५,०००/- |
| ४ | इतर भागात काम करणारे विशेष तज्ञ अर्हताधारक | रु. ८५,०००/- |

उक्त शासन निर्णयातील तक्त्यानुसार अ.क्र. ३ व ४ नुसार नमुद मुद्याचा विचार करता महापालिकेमध्ये कार्यरत असणा-या वैद्यकिय अधिकारी/ तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांचे मानधनात वाढ करणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीतीत कोवीड १९ आजाराचे अनुषंगाने उद्भवलेली आपत्कालीन

परिस्थिती विचारात घेता तज्ञ वैद्यकिय अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी यांची रुग्णालयीन कामकाजाकरीता अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे सद्यस्थ परिस्थितीमध्ये कार्यरत असणा-या मानधनावरील व बंधपत्रित वैद्यकिय अधिका-यांच्या तसेच यापुढे नव्याने नेमणुक होणा-या वैद्यकिय अधिकारी यांचे मानधनामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. वैद्यकिय विभागांतर्गत कार्यरत असणा-या पदांना यापूर्वीचे प्रचलित पध्दतीनुसार देय मानधन तसेच सदरचे मानधनामध्ये आवश्यक वाढीच्या रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे:

| शैक्षणिक अर्हता | प्रचलित मानधन दरमहा | प्रस्तावित मानधन दरमहा |
|---|---|---|
| एम.बी.बी.एस. + पदव्युत्तर पदवी | ६५,०००/- | ८५,०००/- |
| एम.बी.बी.एस. + पदव्युत्तर पदवीका | ६०,०००/- | |
| एम.बी.बी.एस. | ५५,०००/- | ७५,०००/- |

तरी सद्यस्थितीत कोवीड १९ संसर्गामुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे पार्श्वभूमीवर वैद्यकिय विभागामार्फत गट “अ”, “ब”, “क” व “ड” मधील मानधन स्वरुपात आवश्यकते प्रमाणे भरणेत आलेली पदे तसेच भविष्यात भरण्यात येणा-या पदांना मंजूरी मिळणेस त्याचप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी तसेच बंधपत्रित वैद्यकिय अधिकारी यांचे मानधनात वाढ करणेस व मानधन स्वरुपातील पदांना अदा करावयाचे मानधनाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५६ विषय क्रमांक – ५
दिनांक – २२/०७/२०२० विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ –मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/स्था/कावि/८४/२०२०, दि.१३/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क-क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नेहरूनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडीयम मधील सुमारे 5.15 एकर एवढ्या क्षेत्रफळाच्या क्रिकेट स्टेडीयम च्या जागेवर “कोरोना” (COVID-19) रूग्णांच्या उपचारा साठी तात्पुरत्या स्वरूपाचे सुमारे 2000 बेडचे रूग्णालय उभारणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून या जागेवर “कोरोना” (COVID-19) केअर सेंटर उभारणे साठी ज्योत्याचे बांधकाम करणे, तात्पुरत्या स्वरूपाचे शेड व मोठी दालने तयार करणे, महिला व पुरूषांसाठी स्वच्छतागृहे उभारणे, ऑफीस तसेच इतर आवश्यक कामे करावी लागणार आहेत. सदर कामे करणेकामी या कामांचे नियोजन, संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे, स्ट्रक्चरल डीझाईन करणे,पुर्वगणनपत्रक, निविदा संच तयार करणे इ. निविदा पुर्व कामे करणेकरीता कामासाठी तज्ञ वास्तुविषारद यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. “कोरोना” (COVID-19) या रोगाविरूध्दच्या लढाईमध्ये योगदान देणेच्या दृष्टीकेनातून सदर कामासाठी आवश्यक निविदा पुर्व आर्किटेक्चरल कामे फक्त रक्कम रू.1/- एवढा मोबदला घेऊन करणेस तयार असलेबाबतचे पत्र मे.नियोजन कन्स्लटंट यांनी दि.8 जुलै, 2020 रोजी

मनपास दिलेले आहे. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आण्णासाहेब मगर स्टेडियम मैदानामध्ये "कोरोना" (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे कामाच्या निविदा पुर्व आर्किटेक्चरल कामासाठी मे.नियोजन कन्स्लटंट यांची तज्ञ वास्तुविषारद म्हणून नेमणूक करणेस तसेच सदरचे कामापोटी एकूण रक्कम रू.1/-(अक्षरी रक्कम रू.एक फक्त) एवढी फी सर्व करांसहित अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५७ विषय क्रमांक – ६

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – जलनि:सारण

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जनि/२/कावि/७०८/२०२०, दि.१०/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा COVID-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा लागू करणेबाबत अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्यामुळे जलनि:सारण विभागाकडील सन 2019-20 मधील व त्यापुर्वीच्या चालू असलेल्या विकास कामांची बिले 31 मार्च 2020 पर्यंत अदा करणे शक्य झाले नाही. सदरची बिले ठेकेदारास अदा करणे आवश्यक आहे. सदरची अखर्चीत रक्कम उपलब्ध होणेकामी लेखा विभागाकडे मागील वर्षाच्या शिल्लक रक्कमेची मागणी करणेत आलेली होती. लेखा विभागाने मागील शिल्लक रक्कमेतून आवश्यक रक्कम उपलब्ध करुन दिलेली असून त्यानुसार प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. खालील तक्त्यात नमुद केलेनुसार एकुण 99 विकास कामांना बिले अदा करणेकामी रक्कम रुपये 12,69,91,848/- ची आवश्यकता असल्याचे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे. सोबत कामनिहाय यादी जोडणेत आलेली आहे. माहे एप्रिल 2020 मध्ये सन 2019-20 मधील अखर्चित रक्कमेपैकी कोणतीही रक्कम अदा करणेत आलेली नाही. तरी प्रस्तावा सोबतचे प्रपत्रांनुसार खालील तक्त्यात नमूद केलेनुसार लेखा विभागाकडे उपलब्ध असलेल्या मागील वर्षाच्या शिल्लक रक्कमेमधून सदर बिले अदा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 102 नुसार मा. स्थायी समितीच्या कडून मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | मुख्यालय | कामांची संख्या | अदा करावयाची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | अ मुख्यालय | 5 | 51,50,000/- |
| 2 | ब मुख्यालय | 4 | 53,00,000/- |
| 3 | क मुख्यालय | 13 | 1,02,87,746/- |
| 4 | ड मुख्यालय | 7 | 60,82,533/- |
| 5 | ई मुख्यालय | 24 | 3,56,66,398/- |
| 6 | ग मुख्यालय | 7 | 1,30,90,518/- |
| 7 | ह मुख्यालय | 11 | 1,59,19,966/- |
| 8 | जलनि:सारण देखभाल दुरुस्ती | 28 | 3,54,94,687/- |
| | एकुण | 99 | 12,69,91,848/- |

तरी वरील तक्त्यात नमुद केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 102 अन्वये मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५८ विषय क्रमांक – ७

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – नगरसचिव

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/१/कावि/७२१/२०२०, दि.१७/०७/२०२०

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५९ विषय क्रमांक – ८

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभां/०५/कावि/६९५/२०२०, दि.१०/०७/२०२०

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विविध विभागांसाठी आवश्यक A-4 व लिगल पेपर रिम खरेदीकामी केंद्र शासनाच्या GeM पोर्टलवर GEM Bid No.GEM/2020/B/626106 अन्वये निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार लघुत्तम निविदाकार मे.सिद्धि कॉपीयर & स्टुडंट कन्झ्युमर स्टोअर, पिंपरी यांनी दर कमी करुन A-4 पेपर रिमसाठी र.रु.210/- प्रती रिम (सर्व करांसह) व लिगल पेपर रिमसाठी र.रु.220/- प्रती रिम (सर्व करांसह) हे दर फेरसादर केले असुन स्विकृत करण्यात आलेले आहेत. त्यांच्या समवेत करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने A-4 व लिगल पेपर रिम प्रत्येकी 5000 रिम खरेदी करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.21,50,000/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख पन्नास हजार फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६०
विषय क्रमांक – ९
दिनांक – २२/०७/२०२०
विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सुचक – मा. शितल शिंदे
अनुमोदक – मा.आरती चौंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/५/कावि/२२३/२०२०, दि.१५/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

M/S Revmax Telecom Infrastructures यांच्यामार्फत PCMC Smart Sarathi Mobile Application सोबत Integration व Customization करुन MedOnGo यांच्यामार्फत विकसित करण्यात आलेल्या Vertual OPD For PCMC Citizens या प्रणालीचा वापर करुन शहरातील नागरिकांना विशेषत: वृद्ध व लहान मुले यांना प्रत्यक्ष दवाखान्यात न जाता त्यांच्या आजाराबाबत दुरध्वनीद्वारे मोबाईलद्वारे माहिती दिल्यानंतर मोबाईलद्वारे (Audio/ Video) औषधोपचार उपलब्ध करुन देणेकामी तीन महिने कालावधी करिता येणारा खर्च र.रु.29,50,000/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख पन्नास हजार फक्त) (सर्व करांसह) IDBI बँकेमार्फत प्राप्त झालेल्या CSR फंडातुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६१
विषय क्रमांक – १०
दिनांक – २२/०७/२०२०
विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा.अभिषेक बारणे
अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षेका/१/कावि/७०/२०२०, दि.१५/०७/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल बालेवाडी येथील वसतीगृहाच्या इमारती ए व बी मध्ये कोविड-१९ अलगीकरण केंद्र (COVID CARE CENTERE) स्थापण केलेले आहे. सध्या सदर ठिकाणी लोकांना कोविड-१९ अलगीकरण केंद्रा मध्ये ठेवणेत आलेले आहे. तथापी दिवसा व रात्रीच्या वेळेस लाईट गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरीकांची गैरसोय होत आहे त्या मुळे सदर ठिकाणी जनरेटरची सोय करणेत यावी तसेच विद्युत व्यावस्था व त्या अनुषांघीक कामकाजा करीता २४ तास वायरमन कर्मचारी त्वरीत नेमणुक करणेत यावी अशी मागणी मा.सहाय्यक आयुक्त श्री.सुनिल आलनलेकर, पिपरी चिंचवड महानगर पालिका यांनी पत्र क्र.आप/१/कावि/२८८/२०२० दिनांक १२/५/२०२० चे पत्रान्वये करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी सहाय्यक आयुक्त श्री.सुनिल आलमलेकर, पिपरी चिंचवड महानगरपालिका यांचेशी मा.कार्यकारी अभियंता(वि.) ड क्षेत्रिय कार्यालय झालेल्या दुरध्वनी वरील चर्चेनुसार तात्पुरत्या स्वरूपात २ इमारतींसाठी ६२.५ केव्हीए चा जनरेटर बसवावा लागेल त्याचा प्रति महीना साठीचा खर्च र.रू.१,१८,८००/- तसेच अकुशल कर्मचारी यांचे किमान वेतन प्रती महीना र.रू.२२,८३०/- असे आहे. सदर साठी ठेकेदारी पध्दतीने ३ पाळ्यांमध्ये कामगार नेमणुक करणे करीता. सद्यस्थितीत अंदाजे ४ महीने करीता सदर व्यवस्था कार्यान्वीत ठेवणे करीता एकुण र.रू.६,६३,२५१/- (अक्षरी र.रू.सहा लाख त्रेसष्ठ हजार दोनशे एक्कावन्न फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तात्पुरत्या स्वरूपात जनित्र संच बसविणेचे काम गत वर्षि प्रमाणे मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांचे निविदा नोटीस क्र.२/१६ २०१९-२० चे अन्वये १.६% कमी दराने करून घेण्यात आलेले आहे. सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. सबब सदरचा खर्च मुख्यकार्यालय मध्यवर्ती भांडार विभागा

कडील “कोरोना निधी”या निधीतुन र.रू.६,६३,२५१/- खर्च करणेस तसेच मे. मोरया मंडप डेकोरेटर्स यांचे अंदाजपत्रकिय रकमे पेक्षा १.६% कमी दराने थेट पध्दतीने काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६२ विषय क्रमांक – ११

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आमुका/११/कावि/१५४/२०२०, दि.१६/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनपा मालकीच्या इमारतीमधील कार्यालये दवाखाने मनपा शाळा उद्याने व इतर ठिकाणी असणा-या जमिनीवरील व छतावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांच्या शास्त्रोक्त पध्दतीने साफसफाई व स्वच्छता करणे याकामाची २ वर्ष कालावधीसाठी निविदा नोटीस क्र.९-१ ते ९-६/२०१६-२०१७ प्रसिध्द केली होती सदर नोटीस निविदेची मुळ मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्ठात आलेली आहे तसेच सदर कामाची नविन निविदा प्रसिद्ध केलेली असून निविदा प्रक्रिया होणेस काही कालावधी लागणार असल्याने मे.साइ टॅक क्लिन सर्व्हिसेस प्रा.लि. या संस्थेस दि.१/६/२०२० ते दि.३१/८/२०२० अखेर (३ महिने) अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्याकरिता येणा-या र.रू.१२,८७,०६०/- (अक्षरी र.रू.बारा लाख सत्याऐंशी हजार साठ फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६३ विषय क्रमांक – १२

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचेकडील पत्र क्र.पापु/८/कावि/४५८/२०२०, दि.१७/०७/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र “अ” (१ ते २१) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

## सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – ७२६४ विषय क्रमांक – १३
दिनांक – २२/०७/२०२० विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क/२७२/२०२०, दि.२२/०७/२०२०
२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क/२७३/२०२०
दिनांक २२/७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये "कोरोना" (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे कामाची नविदा प्रसिध्द करणेत आलेली असुन सदर कामासाठी खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पा.क्र. व अ.क्र. | लेखाशिर्ष | सन 2020-21 चे अंदाजपत्रकात केलेली मुळ तरतूद | वाढ | घट | 2020-21 ची सुधारीत मुळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | प्रभाग क्र. ६ मधील आरक्षण क्र. ४३२ विकसित करणे. | 64/4 | विशेष योजना | 4,40,00,000 | - | 1,10,00,000 | 3,30,00,000 |
| 2) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये"कोरोना"(COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे. | नविन काम | विशेष योजना | 0 | 1,10,00,000 | 0 | 1,10,00,000 |
| | **एकूण** | | | **4,40,00,000** | **1,10,00,000** | **1,10,00,000** | **4,40,00,000** |

तरी वरील प्रमाणे वाढ-घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६५ विषय क्रमांक – १४

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – १) मा.अति. आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२७४/२०२०, दि.२२/०७/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२७५/२०२० दि.२२/७/२०२०

मा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.04/01/2020-21अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये कोरोना (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.शिवम एन्टरप्रायझेस (माटा) नि.र.रू.1,09,95,246/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी नऊ लाख पंच्यान्नव हजार दोनशे शेहचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,09,34,646/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,09,34,646/- पेक्षा 24.99% कमी म्हणजेच र.रु.8,20,2078 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.29,052/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.60,600/- = एकुण र.रु.8,29,1730 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६६ विषय क्रमांक – १५

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – नागरी सुविधा केंद्र

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुडे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नासुके/२/कावि/१०८/२०२०, दि.२२/०७/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नासुकें/२/कावि/१०९/२०२० दि.२२/७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

COVID-19 आपत्कालीन उपाययोजना COVID-19 Call Centre व COVID-19 Data Entry चे कामकाजासाठीखाजगी तत्त्वावरील नागरी सुविधा केंद्रचालकांकडील आवश्यक (साहित्य) लॅपटॉप, इंटरनेट – डोंगल व एकूण ४० Data entry operator यांची व्यवस्था करणेत येणार आहे. सदर कामकाजासाठी केंद्रचालकांच्या data entry operator यांना मासिक पद्धतीने द्यावयाचे मानधन अदायगी चा खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या ई-गव्हर्नन्स या लेखाशिर्षामधून करणेत येणार आहे.तसेच

सदर कामकाजामध्ये वाढ झालेस वाढीव Data entry operator यांची थेट पद्धतीने नियुक्ती करुन त्यांना पुणे महानगरपालिकेचे धर्तिवर (outsourcing केलेल्या पद्धतीने) र.रू.१९,५००/- + १,५०० (internet + laptop charges) असे एकूण र.रु.२१,०००/- मानधन प्रती Data entry operator यांना प्रतिमहा प्रमाणे पुढील ३ महिने कालावधीसाठी थेट पद्धतीनेनियुक्ती करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६७ विषय क्रमांक – १६

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अबंरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – १) मा.सह शहर अभि.(वि/यां) यांचेकडील पत्र क्र.विमुका/४/२३३/२०२०, दि.२०/०७/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/०४/कावि/२३४/२०२० दि.२२/७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र. 01-01/2020-2021 अन्वये ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सांगवी उपविभागातील गॅस शव दाहिनीचे तीन वर्षाकरीता चालन, देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.कल्याणी एन्टरप्रायजेस निविदा र.रु.42,32,608/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख बत्तीस हजार सहाशे आठ फक्त) पेक्षा -4.00% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६८ विषय क्रमांक – १७

दिनांक – २२/०७/२०२० विभाग – अति.आयुक्त(३) कार्या.

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आअ/कावि/३/२०२०, दि.१७/०७/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अआ/कावि/२३/२०२० दि.२२/७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये जागतिक साथरोग COVID – 19 चा प्रार्दुभाव मोठ्या प्रमाणात वाढताना दिसून येत आहे. म.न.पा. क्षेत्रात या साथीच्या रोगास मार्च २०२० मध्ये सुरुवात होऊन माहे जुलै २०२० मध्ये एकुण बाधीत रुग्णांची संख्या सुमारे ८५०० च्या जवळपास पोहोचलेली आहे. मागील काही दिवसात रोजच्या रुग्ण संख्येत होणा-या वाढीचा सुमारे ३०० ते ५०० हा आकडा विचारात घेता एकुण संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होईल असे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये म.न.पा.ने काही कोविड सेंटर/ रुग्णालये यापूर्वी सुरु केलेली आहेत व आवश्यकतेप्रमाणे अजून कोविड सेंटर सुरु करण्याचे नियोजन आहे. सदर ठिकाणी लागणारा कर्मचारी वर्ग अपुरा पडण्याची शक्यता असल्याने शहरातील

नागरीकांकडून मानसेवि (Voluntee) म्हणून काम करण्यास तयार असल्याबाबत माहे एप्रिल २०२० मध्ये महापालिकेमार्फत आवाहन करण्यात आले होते. यासाठी इच्छुक नागरीकांना म.न.पा.च्या संकेतस्थळावर नांव नोंदणी (Registration) करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास चांगला प्रतिसाद मिळून त्यावेळी सुमारे २५०० नागरिकांनी मानसेवि (Volunteer) म्हणून नोंदणी केली आहे. सद्यस्थितीत अशा प्रकारच्या मानसेविंची (Volunteer) ची तातडीची गरज निर्माण झालेली आहे. सदर मानसेवि (Volunteer) कडून कोविड सेंटर/ रुग्णालयासाठी संगणकीय नोंदी घेणे (Data Entry), रुग्णांची पाणी, जेवण इ. व्यवस्था पाहणे अशा प्रकारची कामे करुन घेण्याचे प्रयोजन आहे. सदर मानसेवि (Volunteer) कडून स्वयंघोषणापत्र घेण्यात येणार असून किमान ४ तास किंवा जास्त तास वेळ सेवा देणा-या मानसेवि (Volunteer) यांना त्यांचे प्रवास खर्च व भोजन यासाठी काही मानधन देणे आवश्यक आहे. मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनूसार सदर मानसेविंना र.रु.३००/- प्रतिदिन एवढे मानधन प्रवास खर्च व भोजनाकामी देणेचे त्यांनी सुचविले आहे. त्यानुसार सदर मानसेवि (Volunteer) यांना प्रतिदिनी र.रु.३००/- इतके मानधन ते जेवढे दिवस काम करतील त्या दिवसांचे अदा करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व सदरचा खर्च COVID - 19 अंदाजपत्रकातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२६९ विषय क्रमांक – १८

दिनांक – २२/०७/२०२०

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

अग्निशामक विभाग हा मनपाचा अत्यावश्यक सेवेचा तातडीक विभाग आहे. सद्याचे करोना कोविड १९ विषाणू प्रादुर्भाव व संभाव्य पूर परिस्थितीती विचारात घेता तसेच अग्निशामक विभागातील अद्यावत वाहनांची विमोचन बोटी, पंप, ई तांत्रिक उपकरणांची तातडीने वर्दिचे ठिकाणी व अग्निशामन केंद्रामध्ये देखभाल दुरूस्ती निगा राखणेकामी अग्निशामक विभागामध्ये अनुभवी कनिष्ठ अभियंता (अटोमोबाईल व यांत्रिकी) वर्ग कमी असल्याने अत्यावश्यक सेवेची कामकाजाची निकड लक्षात घेता अग्निशामक विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर दि.१३/०५/२०१८ ते १२/११/२०१८, दि.१०/०१/२०१९ ते १०/०७/२०१९, दि.२३/१/२०२० ते २२/७/२०२० अशा सहा-सहा महिने कालावधीकरिता श्री.जयदिप ह. पवार यांची नेमणूक करणेत आली आहे. त्यांची मुदत दि.२२/७/२०२० रोजी संपत असल्याने दि.२३/७/२०२० या एक दिवसाची सेवा खंडीत करून दि.२४/७/२०२० पासून त्यांना ६ महिने कालावधी करिता दरमहा र.रू.२०,०००/- एकत्रित मानधनावर कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर नेमणूक करणेस व यासाठी येणा-या एकूण र.रू.१,२०,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख वीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७० विषय क्रमांक – १९

दिनांक – २२/०७/२०२०

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

सन २०१२०-२१ च्या अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.२० मधील कामांच्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | अंदाजपत्रकीय र.रू. | लेखाशिर्ष | सन २०२०-२१ ची मुळ अंदाज (उपलब्ध तरतूद) | वाढ करावयाची तरतूद | घट कारावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाय.सी.एम.हॉस्पीटल येथे पदव्युत्तरपदवी अभ्याक्रमासाठी आवश्यक कामे करणे नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे डॉक्टरांचे निवस्थान नुतनीकरण करणे (भाग-२) (फेज-२) | १७ | २७ | ५९,००,००,००० | विशेष योजना | ४,००,००,००० | ११,००,००,००० | ० |
| २ | भूसंपादन निधी | ३४२ | ३ | -- | -- | १,५०,००,००,००० | ० | ११,००,००,००० |
| एकूण | | | | | | | ११,००,००,००० | ११,००,००,००० |

वरील कामासाठी सन २०२०-२१ साठीचे अंदाजपत्रकात वरीलप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/६८४/२०२०
दिनांक – २३/०७/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(क्र.काशा / ३ / कावि / १९१ / २०२० दि.२९ / ०६ / २०२० विषय क्र.१ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी – १८

वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभाग

**प्रपत्र अ**

**विषय पत्र -** कोरोना विषाणू कोविड १९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मे. श्री. शिवसमर्थ ट्रॅव्हल्स भोसरी यांच्याकडून भाडेतत्वावर पुरविण्यात आलेल्या वाहनाचे खर्चास मान्यतेबाबत.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे, पिंपरी चिंचवड व बारामती यांचे कडील मंजूर दरपत्रकाप्रमाणे झालेला खर्च माहिती

(दि.२०/०३/२०२० ते दि.३१/०५/२०२०) = २५ वाहने

| अ.क्र | पुरवठादार/ कालावधी | वाहन प्रकार | प्रति दिन मंजूर दर + इंधन | झालेला खर्च (GST वगळून) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. श्री. शिवसमर्थ ट्रॅव्हल्स भोसरी | तवेरा | २२००/- + इंधन | १२,१२,२००/- |
| | | झायलो, ईर्टीगा, इनोव्हा, स्कॉर्पिओ | २६००/- + इंधन | ३२,८९,०००/- |
| | | | | ४५,०१,२००/- |
| | | | GST = | २,२७,७०८/- |
| | | | एकूण | ४७,२८,९०८/- |

माहे जून २०२० ते ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत ३ महिन्यांकरीता सद्य स्थितीत वापरात असलेल्या ३० वाहनांकरीता संभाव्य खर्च अंदाजे २५.०० लक्ष प्रति महिना या प्रमाणे ७५.०० लक्ष अपेक्षित आहे.

**एकुण खर्च** – ४७,२८,९०८/- + ७५,००,०००/- = १,२२,२८,९०८/-

अतिरिक्त आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

**(क्र.इक्षेका/नि-६/कावि/३९/२०२० दि.१३/७/२०२० विषय क्र ३ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
इ क्षेत्रिय कार्यालय विदयुत विभाग सन 2019-2020
प्रपत्र अ क्रमांक इक्षेका/नि-०६/कावि/ ३८ /२०२० दि२३/७/२०२०

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | दिनांक | एकूण निविदा रक्कम | निविदा दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. अथर्व इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस | इ. क्षे. का. विदयुत 2-5-2019-20 | प्रभाग क्र. ७ मधील गव्हाणेवस्ती येथील भोसरी हॉस्पीटल उद्वाहकाचे वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे. (मे. एशियन इलेव्हेटर्स ) | 16/11/2019 | क्र.इक्षेका/नि-06/22/2020 | 27/02/2020 | 109314 | 0.24% | 109052 |
| २ | मे.फोनीक्स इन्फ्रास्ट्रक्चर | इ. क्षे. का. विदयुत 3-1-2019-20 | जुने भोसरी हॉस्पीटल येथील सी.सी.टि.व्ही. यंत्रणेची वार्षिक पध्दतीने तीन वर्षासाठी देखभाल दुरुस्ती करणे. | 30/1/2020 | क्र.इक्षेका/नि-06/23/2020 | 27/02/2020 | 610321 | 1.25% | 602692 |

711744

सहा.आयुक्त
तथा
क्षेत्रिय अधिकारी
क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

## (क्र.पापु/८/कावि/४५८/२०२० दि.१७/७/२०२० विषय क्र १२ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पाणीपुरवठा विभाग पिंपरी-१८
क्र.पापु/कावि/०८/ ४५८/२०२०
दि. १७/ ०७/२०२०

प्रपत्र अ (१ ते ३)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे.जय इंजिनिअर्स | २/१६/२०१९-२० | सन २०१९-२० करिता भगत वस्ती व गुळवे वस्ती येथे आवश्यतेनुसार पाईपलाईन टाकणे व देखभाल दुरुस्ती कामे करणे. | 20-03-2020 | पापु /८/कावि/३५५/२०२० | 20-05-2020 | 12,50,106 | 12,49,752 | 354 | 0 | 30.00 | % कमी | 8,75,180 |
| २ | मे.जय इंजिनिअर्स | २/१२/२०१८-१९ | सन २०१९-२० करिता प्रभाग क्र. ८ इंद्रायणीनगर परिसरात आवश्यकतेनुसार नविन डी.आय पाईप लाईन टाकणे व आवश्यक देखभाल दुरुस्ती करणे. | 20-03-2020 | पापु /८/कावि/३५४/२०२० | 20-05-2020 | 12,50,519 | 12,49,929 | 590 | ० | 30.00 | % कमी | 8,75,540 |
| ३ | मे.जय इंजिनिअर्स | २/२०/२०१९-२० | अक्षयनगर, आनंदनगर भागात आवश्यकतेनुसार डी.आय पाईपलाईन टाकणे व दुरुस्तीविषयक कामे करणे. (सन २०१९-२०) | 20-03-2020 | पापु /८/कावि/३५६/२०२० | 20-05-2020 | 8,33,350 | 8,32,996 | 354 | ० | 28.00 | % कमी | 6,00,111 |
| ४ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २/१९/२०१९-२० | प्रभाग क्र. ६ मधील पाणीपुरवठा सुरळीत राहण्याकामी आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (सन २०१९-२०) | 20-03-2020 | पापु /८/कावि/३५९/२०२० | 20-05-2020 | 8,75,067 | 8,74,712 | 354 | 0 | 30.00 | % कमी | 6,12,652 |
| ५ | मे.जय इंजिनिअर्स | २/१७/२०१९-२० | सन २०१९-२० करिता सदगुरुनगर, धावडे वस्ती व इतर ठिकाणी आवश्यतेनुसार पाईपलाईन टाकणे व देखभाल दुरुस्ती कामे करणे.वार्ड क्र.६ | 20-03-2020 | पापु /८/कावि/३५८/२०२० | 20-05-2020 | 12,50,497 | 12,50,143 | 354 | ० | 30.00 | % कमी | 8,75,454 |
| ६ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २/१८/२०१९-२० | सन २०१९-२० करिता चक्रपाणी वसाहत येथे आवश्यतेनुसार पाईपलाईन टाकणे व देखभाल दुरुस्ती कामे करणे. | 20-03-2020 | पापु /८/कावि/३५७/२०२० | 20-05-2020 | 12,50,500 | 12,50,146 | 354 | 0 | 31.00 | % कमी | 8,62,955 |
| ७ | मे.जय इंजिनिअर्स | २/२१/२०१९-२० | आळंदी रोड भागात आवश्यकतेनुसार डी.आय पाईपलाईन टाकणे व दुरुस्तीविषयक कामे करणे. (सन २०१९-२०) | 20-03-2020 | पापु /८/कावि/३५३/२०२० | 20-05-2020 | 8,33,499 | 8,33,145 | 354 | 0 | 28.00 | % कमी | 6,00,218 |
| ८ | मे.एच.एम.कन्स्ट्रक्शन | २/६७/२०१९-२० | प्रभाग क्र.१३ मधील से.२२ येथील जलकुंभाच्या आवारातील विकास कामे करणे. | 19-05-2020 | पापु /८/कावि/३७७/२०२० | 09-06-2020 | 14,73,986 | 14,67,753 | 6,233 | 0 | 15.55 | % कमी | 12,45,750 |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | मे.जीवनधारा ट्यूब वेल कंपनी | २/२२/२०१९-२० | सन २०१९-२० करिता क क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत दुरुस्ती अंतर्गत ठिकठिकाणी बोअरवेल घेणे व दुरुस्त करणे. | 16-03-2020 | पापु/८/कावि/३७१/२०२० | 16-03-2020 | 12,50,002 | 12,50,002 | 0 | 0 | 1.00 | % कमी | 12,37,502 |
| १० | मे.जीवनधारा ट्यूब वेल कंपनी | २/७६/२०१९-२० | सन २०१९-२० करिता संत तुकाराम नगर, वल्लभनगर, फुलेनगर, रत्ना हॉटेल, लांडेवाडी, कासारवाडी, फुगेवाडीउप विभागांसाठी नविन कुपनलिका करणे व जुन्या कुपनलिकांचे देखभाल दुरुस्ती करणे. | 09-03-2020 | पापु/८/कावि/३६९/२०२० | 03-06-2020 | 18,75,440 | 18,75,440 | 0 | 0 | 1.00 | % कमी | 18,56,686 |
| ११ | मे.जीवनधारा ट्यूब वेल कंपनी | २/६६/२०१९-२० | फ प्रभाग अंतर्गत ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार बोअरवेल घेणे व दुरुस्ती करणे. | 20-02-2020 | पापु/८/कावि/२३३/२०२० | 05-02-2020 | 14,98,152 | 14,98,152 | 0 | 0 | 1.00 | % कमी | 1483170.00 |
| १२ | मे.जीवनधारा ट्यूब वेल कंपनी | २/५०/२०१९-२० | इ प्रभागात विविध ठिकाणी बोअरवेल घेणे व दुरूस्ती विषयक कामे करणे.(सन २०१९-२०) | 20-02-2020 | पापु/८/कावि/२३१/२०२० | 25-02-2020 | 14,89,098 | 14,89,098 | 0 | 0 | 1.00 | % कमी | 1474207.00 |
| १३ | मे.सागर कन्स्ट्रक्शन | २/०२/२०१९-२०. | अ क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग क्र.१० मधील विद्यानगर, दत्तनगर, शंकरनगर, कुंभार गल्ली, दातीर पाटील चाळ, इंदिरानगर, अण्णासाहेब मगर झोपडपट्टी, सायन्स पार्क, ऑटो कस्टर परिसर इ.भागात पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीविषयक कामे करणे | 28-02-2020 | पापु/८/कावि/२८१/२०२० | 26-03-2020 | 22,49,965 | 22,46,435 | 3,531 | 0 | 17.10 | % कमी | 1865826.00 |
| १४ | मे.सागर कन्स्ट्रक्शन | २/०५/२०१९-२० | अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.१४ मध्ये काळभोरनगर, चिंचवड स्टेशन, मोहननगर, रामनगर व फुलेनगर परिसरात पाणीपुरवठा विषयक किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | 28-02-2020 | पापु/८/कावि/२८३/२०२० | 26-03-2020 | 22,49,642 | 22,46,112 | 3,531 | 0 | 18.90 | % कमी | 1825128.00 |
| १५ | मे.मे.भारतीय महिला स्वंय रोजगार सेवा सह.संस्था मर्यादित | २/३०/२०१९-२० | प्रभाग क्र. १० मधील नव्याने विकसित होणा-या श्रद्धा हेरिटेज व सेंट्रल मॉलच्या पाठीमागचा परिसरात पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | 28-01-2020 | पापु/८/कावि/२५६/२०२० | 18-03-2020 | 13,49,805 | 13,49,175 | 630 | 0 | 21.00 | % कमी | 1066478.00 |
| १६ | मे.दीप कन्स्ट्रक्शन | २/०३/२०१९-२० | अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.१४ मध्ये विठ्ठलवाडी, दत्तवाडी, तुळजाईवस्ती, ज्ञानेश्वर कॉलनी, दवाबाझार, चिंचवड रेल्वे स्थानक परिसरात पाणीपुरवठा विषयक किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | 17-02-2020 | पापु/८/कावि/२४९/२०२० | 25-02-2020 | 17,91,107 | 17,88,850 | 2,257 | 0 | 20.17 | % कमी | 1430296.00 |
| १७ | मे.दीप कन्स्ट्रक्शन | २/०८/२०१९-२० | अ क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग क्र.१५ मधील पेठ क्र.२७,२७-अ,२८, गंगानगर व इतर भागात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | 11-02-2020 | पापु/८/कावि/२५१/२०२० | 02-03-2020 | 22,49,190 | 22,45,660 | 3,530 | 0 | 20.17 | % कमी | 1796240.00 |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | मे.दीप कन्स्ट्रक्शन | २/०६/२०१९-२० | अ क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग क्र.१५ मधील पेठ क्र.२३ वाहतुकनगरी, पेठ क्र.२४,२५,२६ व निगडी गावठाण व इतर भागात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे..(सन २०१९-२०) | 11-02-2020 | पापु /८/कावि/२५३/२०२० | 02-03-2020 | 22,49,998 | 22,49,093 | 905 | 0 | 20.40 | % कमी | 1791183.00 |
| १९ | मे.भारतीय महिला स्वंय रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित | २/२९/२०१९-२० | प्रभाग क्र. १० मधील संत ज्ञानेश्वर नगर, मोरवाडी, अमृतेश्वर कॉलनी, लालटोपीनगर भागात देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | 27-12-2019 | पापु /८/कावि/२५८/२०२० | 18-03-2020 | 24,99,511 | 24,98,921 | 590 | 0 | 21.00 | % कमी | 1974738.00 |
| २० | मे.संजय कॉन्ट्रक्टर | ४/१०/२०१९-२० | सन २०१९-२० करिता से .न.७/१० व गवळी माथा संप हाउस येथील रंग रंगोटीं व स्थापत्य विषयक कामे करणे. | 06-03-2020 | पापु /८/कावि/३६५/२०२० | 03-06-2020 | 18,72,812 | 18,62,076 | 10,736 | 0 | 24.00 | % कमी | 1425914.00 |
| २१ | मे.संजय कॉन्ट्रक्टर | ४/२१/२०१९-२० | प्रभाग क्र .९ मधील अजमेरा जलकुंभ परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे .(सन २०१९-२०) | 06-03-2020 | पापु /८/कावि/३६७/२०२० | 06-03-2020 | 12,43,517 | 12,43,517 | 0 | 0 | 25.00 | % कमी | 932638.00 |
| एकुण र.रु. | | | | | | | ३,२८,८५,७६३ | ३,२८,५१,१०७ | ३४,६५७ | ० | | | २,६७,०७,८६६ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८